शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर या संस्थेत स्थापन करण्यात आलेल्या धातुतंत्र प्रबोधिनीच्या नियामक समितीचा कार्यकाल वाढविणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्र. मान्यता-२०१७/(प्र.क्र.२३५ /१७)/तांशि-५,

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २२ फेब्रुवारी, २०१८.

वाचा:-१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक मान्यता-२०१३/(प्र.क्र.२३३/१३) तांशि-५, दि.११/०९/२०१४.

२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/निया. समिती/कोल्हापूर/२०१७/३४१८, दि २०/०५/२०१७.

प्रस्तावना :-

सदर्भ क्र.१ येथील उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक दि.११/०९/२०१४ अन्वये शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर या संस्थेमध्ये “धातुतंत्र प्रबोधिनी” स्थापन करण्यास तसेच धातुतंत्र प्रबोधिनीचे नियमित कामकाज चालविण्यासाठी नियामक समितीची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर नियामक समितीचा कार्यकाळ दोन वर्षाचा होता. सदर कार्यकाळ दिनांक १०/०९/२०१६ पासून संपुष्टात आलेला आहे. उपरोक्त संदर्भ क्र. २ येथील दिनांक २०/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर या संस्थेत धातुतंत्र प्रबोधिनीच्या नियामक समितीचा कार्यकाल दोन वर्षाकरीता वाढविण्यास शासन मान्यता देण्याची विनंती केलेली आहे.

शासन निर्णय :-

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर या संस्थेत शासन निर्णय दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ अन्वये पुढीलप्रमाणे दोन वर्षाच्या कालावधीकरीता धातुतंत्र प्रबोधिनीचे नियमित कामकाज चालविण्याकरीता नियामक समिती स्थापन करण्यास करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

अध्यक्ष	श्री किरण पाटील, चेअरमन, घाटगे पाटील इंडस्ट्रिज, कोल्हापुर
सदस्य	अध्यक्ष, द इंडियन इन्स्टिट्युट ऑफ फौंड्रीमन, कोल्हापुर
सदस्य	द इंडियन इन्स्टिट्युट ऑफ फौंड्रीमन, कोल्हापुर यांचे दोन प्रतिनिधी
सदस्य	स्थानिक उद्योगधंद्यामधील एक प्रतिनिधी
सदस्य	अध्यक्ष, तज्ञ समिती
सदस्य	संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, अथवा त्यांचे प्रतिनिधी
सदस्य	महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे प्रतिनिधी
सदस्य	प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापुर
सदस्य	विभागप्रमुख, धातुशास्त्र विभाग, शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापुर
सदस्य सचिव	मुख्य समन्वयक, धातुशास्त्र प्रबोधिनी

२. सदर धातुतंत्र प्रबोधिनीच्या नियामक समितीचा कार्यकाल दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ पासून पुढे दोन वर्षासाठी वाढवून देण्यास पूर्वलक्षी प्रभावाने शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. समितीची कार्यकक्षा, जबाबदारी तसेच अन्य बाबी दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ चे शासन निर्णयात नमूद केल्यानुसार राहतील.

४. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२२१६०३२७०८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a96579dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842cda576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2018.02.22 16:04:27 +05'30'

(अ. र. काटकर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत),
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-मुंबई/नागपूर (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत),
४. महालेखापाल (लेखा/परीक्षा) महाराष्ट्र-मुबई/नागपूर (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत),
५. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर, (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत),
६. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर, (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत),
७. नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. अवर सचिव (साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
९. मा.मुख्यमंत्री / मा.मंत्री (उ. व तं. शि.)/ मा.राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव,
१०. निवड नस्ती /तांशि-५.